# महाराष्ट्र शासन
# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com


क्र.वैशिप्र-१०२०/प्र.क्र.२२/नीट-युजी-२०२०/AIQ 15%/निवड यादी/२०२०/११९४ दिनांक: ०९/१२/२०२०

प्रति,
अधिष्ठाता/ प्राचार्य,
सर्व खाजगी विनाअनुदानित/अल्पसंख्यांक
आयुर्वेद/युनानी/होमिओपॅथी अभ्यासक्रमाची महाविद्यालये

**विषयः- नीट युजी - २०२० ऑल इंडिया कोटा प्रवेश आयुर्वेद/युनानी/होमिओपॅथी निवड यादी संबंधी महत्वाच्या सुचना.**

**संदर्भ :- राज्य सीईटी कक्षाकडील सूचना क्र. ०४/१०७६, दिनांक २७/११/२०२०**

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता नीट युजी - २०२० या पात्रता प्रवेश परीक्षेव्दारे जाहिर केलेल्या गुणवत्ता यादीनुसार आरोग्य विज्ञान आयुर्वेद/युनानी/ होमिओपॅथी अभ्यासक्रमाची ऑल इंडिया कोट्याची निवड यादी उपरोक्त संदर्भाकित सूचना क्र. ०४ नुसार प्रसिध्द करण्यात येणार आहे. सदर प्रवेश यादीनुसार विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या वेळी करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१) विद्यार्थी प्रवेशापूर्वी ऑल इंडिया कोटा यांचे (aaccc.gov.in) संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नीट युजी - २०२० च्या नियमावली पुस्तिकेचे अवलोकन करावे.

२) विद्यार्थी प्रवेशाकरीता संस्थास्तरावर अधिष्ठाता/प्राचार्य यांचे अध्यक्षतेखाली जेष्ठ अध्यापकांची नियुक्ती करुन सदर प्रवेशासाठी समिती गठित करण्यात यावी. सदर समितीचे कार्यारंभ आदेश राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास अवगत करावे.

३) आपल्या महाविद्यालयातील निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी ईमेलव्दारे पाठविण्यात येईल. सदर यादीतील विद्यार्थ्यांना आपल्या महाविद्यालयाच्या सूचनेमध्ये दिलेल्या वेळेत रुजू करुन घेण्याबाबत कार्यवाही करावी.

४) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेमार्फत पाठविण्यात आलेल्या निवड यादीमध्ये दर्शविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवर्गानुसार संबंधित विद्यार्थ्यांकडे (Central List नुसार) त्याच्या प्रवर्गाची योग्य कागदपत्रे उपलब्ध असणे बंधनकारक आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या यादीमध्ये दर्शविलेल्या प्रवर्गानुसार विद्यार्थ्यांकडे कागदपत्रे उपलब्ध नसल्यास अशा विद्यार्थ्यांबाबत तातडीने आयुक्त, राज्य सीईटी कक्षाकडून मार्गदर्शन घ्यावे.

५) सदर यादीमधील उमेदवारांना प्रवेश देताना त्यांच्या मुळ कागदपत्रांची छाननी/ पडताळणी करणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी संवैधानिक आरक्षणाच्या प्रवर्गातून प्रवेशित झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांकडे जात प्रमाणपत्र (सर्व संवैधानिक आरक्षण असलेल्या विद्यार्थ्यांकडे) आणि आवश्यक असल्यास नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र इतर मागास प्रवर्ग (OBC) विद्यार्थ्यांकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे.

६) वरीलप्रमाणे प्रवेशाकरीता आवश्यक असलेली सर्व मुळ कागदपत्रे पुर्ण असल्याशिवाय विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येऊ नये. **योग्य कागदपत्रांशिवाय प्रवेश केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहिल.**

७) आपल्या महाविद्यालयात/संस्थेत प्रवेशासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क व अन्य शुल्क सूचनेनुसार स्विकारणात यावे. शैक्षणिक शुल्क हे डिमांड ड्राफटच्या स्वरुपात स्विकारण्यात यावे. शनिवार आणि रविवार (सुट्टीच्या दिवशी) शैक्षणिक शुल्क धनादेशाव्दारे स्विकारण्यात यावे आणि विद्यार्थ्यांना दोन दिवसात डिमांड ड्राफट देण्यास सांगावे.

संबंधित महाविद्यालयातील रोखपालांनी आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमासाठीच्या प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारे शैक्षणिक शुल्क आणि इतर शुल्कापोटी वेगवेगळे दोन डी. डी. तो विद्यार्थी त्यांच्या महाविद्यालयातील प्रवेश निश्चित करेपर्यंत किंवा त्याने घेतलेला प्रवेश रद्द करेपर्यंत किंवा डी.डी.च्या वैध कालावधीपर्यंत आपल्याकडे ठेवून घ्यावेत. डी.डी. प्राप्त झाल्यानंतर फक्त डी.डी.ची पोच देण्यात यावी. प्रवेश निश्चित झाल्याशिवाय विद्यार्थ्यास शुल्काची पावती देण्यात येवू नये. विद्यार्थ्याने जर सदर महाविद्यालयातील प्रवेश रद्द करुन दुसऱ्या महाविद्यालयात प्रवेश घेतला तर नियमाप्रमाणे प्रवेश रद्द करण्याचे शुल्क (रुपये १५००/-) फक्त विद्यार्थ्याकडून रोख स्वरुपात घेवून त्याने जमा केलेले दोनही डी.डी. त्याला परत करण्यात यावेत.

८) आपल्या महाविद्यालयात उपरोक्त मुदतीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जर पुढील निवड फेरीत अन्य महाविद्यालयात प्रवेश बदल नको असल्यास अशा विद्यार्थ्याकडून नीट युजी - २०२० च्या माहिती पुस्तिकेमध्ये देण्यात आलेला स्टेटस रिटेंशन फॉर्म भरुन घेण्यात यावा. सदर फॉर्म प्रत्येक फेरीच्या नोटीसमध्ये दिलेल्या वेळेतच स्विकारावा व त्याची नोंद राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावरील College Feedback Module मध्ये त्वरीत करण्यात यावी. तसेच त्याची पोहोच पावती संबंधित विद्यार्थ्यास देण्यात यावी.

9) **<u>RETENTION FORM :-</u>**

**आपल्या महाविद्यालयात रुजु झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील प्रवेश फेरीसाठी भाग घ्यायचा नसेल तर त्यांना aaccc.gov.in या संकेतस्थळावर दिलेल्या FAQ नुसार पुढील प्रवेश फेरीसाठी पसंतीक्रम (Preference) भरु नये, अशा सुचना देण्यात याव्यात.**

१०) या प्रक्रियेत रुजू झालेले विद्यार्थी, रुजू न झालेले विद्यार्थी, प्रवेश रदद् कलेले विद्यार्थी आणि स्टेटस रिटेन्शन अर्ज सादर केलेले विद्यार्थी यांची एकत्रित माहिती ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याकरीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून संगणक प्रणाली तयार करण्यात आलेली आहे. सदर संगणक प्रणालीच्या वापराबाबत खालीलप्रमाणे माहिती देण्यात येत आहे.

- प्रथम राज्य सीईटी कक्षाच्या www.mahacet.org या संकेतस्थळाच्या मुखपृष्ठावरील AIQ (15%) For AYUSH Courses येथे क्लिक करावी. त्यानंतर "College Feedback Module (For Institute Only)" अशी लिंक देण्यात आलेली असुन सदर लिंकवर क्लिक करावे.
- विद्यार्थ्यांचा Joined/Not Joined Status "College Feedback Module" मध्ये अद्ययावत करण्यापूर्वी आपल्या महाविद्यालयाची माहिती (पत्ता/दुरध्वनी क्र.इ.) अद्ययावत करणे आवश्यक आहे.
- त्यानंतर login केल्यानंतर आपणांस आपल्या महाविद्यालयात निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी दिसेल.

- ज्या विद्यार्थ्यांचे "Joined/Not Joined/Cancelled" status update करावयाचे आहे त्याच्या नावासमोरील म्कपज बटनवर क्लिक करावे व पुढील प्रक्रिया पुर्ण करावी.
- आपल्या संगणक स्क्रिनवर आपल्या संस्थेत प्रथम प्रवेश फेरीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. **आपल्या महाविद्यालयात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अपलोड केलेले प्रमाणपत्र तपासावे व अपलोड नसलेले प्रमाणपत्र त्वरीत अपलोड करावे.** सदर यादीमध्ये "Joined/Not Joined/Cancelled/Retention" माहिती भरण्यात यावी व अद्ययावत करण्यात यावी. त्याचप्रमाणे निवड झालेल्या विद्यार्थ्यांकडे त्याच्या प्रवर्गाची प्रवेशासाठीची आवश्यक प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यास College Feedback Module मध्ये Not Joined करुन खालीलप्रमाणे Reason दर्शविण्यात यावे.

| Sr.No. | Reason | | Sr.No. | Reason |
|---|---|---|---|---|
| 1 | Betterment | | 2 | Invalid Gender |
| 3 | Mismatched Category | | 4 | No Caste Certificate |
| 5 | No EWS Certificate | | 6 | No Minority Certificate |
| 6 | No NCL | | 8 | No PWD Certificate |
| 9 | Not eligible for PWD but eligible for Ayush Courses | | 10 | Medically Unfit - Not eligible for Ayush Courses |

- **विद्यार्थी प्रवेशास महाविद्यालयात उपस्थित न राहिल्यास Not Reported असे Reason दर्शविण्यात यावे.**
- सदरची माहिती पुर्णपणे भरल्यानंतर सदरची माहिती अचुक भरली आहे का, याची खात्री करुन घ्यावी. सदर माहितीमध्ये आपणांस कोणताही बदल करावयाचा झाल्यास "Edit" म्हणून पर्याय आपणास उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर माहिती व्यवस्थितरीत्या भरणा केली आहे याची खात्री केल्यानंतर अखेरच्या दिवशी सदर माहितीचा अहवाल "Generate Report" बटणवर क्लिक करावा. जनरेट झालेल्या अहवालाच्या प्रत्येक पानावर अधिष्ठाता/ संस्था- प्रमुखांची स्वाक्षरी व महाविद्यालयाच्या मुद्रांक "College Stamp" घेण्यात यावा.
- **स्वाक्षरी करण्यात आलेली माहिती स्कॅन करुन "Select File" या बटणाद्वारे "Select" करावी. तद्नंतर स्कॅन केलेली माहिती "Upload" बटनाद्वारे पुन्हा "Load" करावी. सदर माहिती "Load" झाल्यानंतर "Final Submission" या बटणावर क्लिक करुन आयुष संचालनालयास आणि राज्य सीईटी कक्षास दिनांक १९/१२/२०२० रोजी सायंकाळी ०७:३० वाजेपर्यंत सादर करावी. तसेच सदरहू माहितीची एक प्रत राज्य सीईटी कक्षाच्या ayush.cetcell@gmail.com या ई-मेल आयडीवर पाठविण्यात यावी.**

११) शिष्यवृत्ती बाबत ऑल इंडिया कोटा प्रवेशाच्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१२) महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या रॅगिंग सदृश्य प्रकारांमध्ये झालेली वाढ लक्षात घेता अशा प्रकारांवर आळा घालण्याकरीता भारतीय आयुर्विज्ञान परिषदेमार्फत दिनांक २१/०२/२००९ आणि दिनांक ०३/०८/२००९ च्या पत्रानुषंगाने मार्गदर्शकतत्त्वे निर्धारित केली असून त्याची प्रत सोबत जोडली आहे. आपणांस कळविण्यात येते की, भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे आवश्यकती सर्व कार्यवाही आपल्यास्तरावर अचूकपणे होणे अत्यंत आवश्यक आहे. या व्यतिरिक्त रॅगिंग प्रतिबंध करावयाच्या दृष्टीने आवश्यकती कार्यवाही

करण्याबाबतचे पत्र आणि शासनाच्या परिपत्रकाची प्रत सोबत जोडली असून आपल्या महाविद्यालयात रॅगिंग प्रतिबंधक करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त बाबत प्राधान्याने व कटाक्षाने कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

**सही/-**
**(चिंतामणी जोशी) भाप्रसे**
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**प्रत माहितीस्तव सादर,**

१) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
२) मा.कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
३) मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
४) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
५) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई